**निवडणूकीसंबंधी गुन्हयात तातडीने**
आरोपपत्र दाखल करण्याबाबत

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

**परिपत्रक क्र. रानिआ/मनपा २००५/प्र.क्र. १४/का.०५**
**नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक :- १२/०४/२००५**

## प रि प त्र क

नुकत्याच पार पडलेल्या २ महानगरपालिकांच्या, ५ नगरपरिषदांच्या व १५९२ ग्रामपंचायतींच्या निवडणूकीच्या वेळी असे स्पष्ट झाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये अतिशय चुरस असते. या चुरसीचे पर्यावसन निवडणूक विषयक गुन्हयांमध्ये बरेचदा होते. यामध्ये प्रतिस्पर्धी उमेदवारांना आणि त्यांच्या समर्थकांना धमकावणे, त्यांना मारहाण करणे, त्यांच्या प्रचार साहित्याची नासधूस करणे, असे गुन्हे असतात. नुकत्याच पार पडलेल्या निवडणूकांमध्ये एका समर्थकांचा खून देखील झाला. ही गुन्हेगारी कमी करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी वेळीच कार्यवाही करणे आवश्यक आहे. पोलिसांनी वेळीच कार्यवाही केल्यास गुन्हेगाराला जरब बसून गुन्हयांचे प्रमाण कमी होते व निवडणूका शांततेत पार पडण्यास मदत होते.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका शांततेत पार पाडण्यासाठी व त्यामध्ये हिंसाचार होवू नये यासाठी पोलिसांनी गुन्हयाची नोंद तात्काळ घ्यावी व अशा गुन्हयांमुळे ज्या अधिनियमांचा भंग झाला असेल, उदाहरणार्थ, मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंधक कायदा, भारतीय दंड संहिता अथवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाविषयक अधिनियम व त्या खालील नियमान्वये गुन्हे नोंदवावे. तसेच निवडणूकीच्या दिवशी घडणाऱ्या गुन्हयांबाबत देखील संबंधित अधिनियमाखाली तात्काळ कारवाई करावी. या गुन्हयांमध्ये बोगस मतदान करणे, मतदाराची ओळख पटविण्यासाठी बनावट कागदपत्रांचा

वापर करणे, मतदानाच्या दिवशी गोंधळ करणे, दंगल करणे किंवा जाहिर प्रचाराचा कालावधी संपला तरी जाहिर प्रचार चालू ठेवणे इत्यादी गुन्हा नोंदविल्यानंतर शक्यतो **३ महिन्यांच्या आत** त्या गुन्हयाची चौकशी करुन, संबंधित न्यायालयात गुन्हा दाखल होईल यासाठी प्रयत्न करावे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमधील हिंसाचार कमी होण्यासाठी गुन्हयाची तात्काळ दखल घेवून, पोलिसांनी त्यावर कार्यवाही करणे व गुन्हया संबंधी आरोपपत्र संबंधित न्यायालयात तातडीने दाखल होणे, ही कार्यवाही अतिशय आवश्यक आहे. अन्यथा, जर वेळेवर कार्यवाही झाली नाही तर हिंसाचाराचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. पोलिस महासंचालक, मुंबई
६. सर्व पोलिस महानिरिक्षक
७. सर्व पोलिस कमिशनर
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक
१२. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायती
१३. राज्य निवडणूक आयोगामधील सर्व अधिकारी
१४. निवड नस्ती

\\Zp\d\ntdzp\11.4.5ntd1.doc\zp